बीजमंत्र

# कांदा लागवडीसाठी सुधारित जातींची निवड फायदेशीर



**प्रा. संजय बडे**
(मो.नं. ७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय,
दहेगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद



पिकाचे चांगले उत्पादन आणि पर्यायाने शेतकऱ्याला आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने कांद्याच्या लागवडीसाठी सुधारित जाती निवडणे हिताचे ठरते. त्यादृष्टीने अशा निवडक सुधारित जातींची माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे.

**बा**जारपेठेच्या दृष्टीने हंगामानुसार जातींची निवड करत असताना काही बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. कांद्याचा आकार मध्यम, रंगामध्ये चकाकी, साठवणुकीत टिकून राहाण्याची क्षमता, पापुद्रे गोलाकार आणि एकमेकांना घट्ट चिकटलेली मान, बारीक मध्यम ते तिखट चव असावी. त्याचप्रमाणे जास्त उग्र वास नको. कांदा कापल्यानंतर त्यात एकच डोळा असावा. याबरोबरच चांगली रोगप्रतिकारक शक्ती आणि भरघोस उत्पादन देणाऱ्या जातींची निवड करणे फायदेशीर ठरते.

**एन-५३ :** या जातीचे कांदे गोलाकार व चपटे असतात. ही जात जांभळट लाल रंगाची आणि चवीने तिखट आहे. खरीप हंगामासाठी महाराष्ट्रात तसेच उत्तर प्रदेशातही लोकप्रिय आहे. या जातीपासून सरासरी उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन मिळते.



**फुले समर्थ :** ही जात रांगडा आणि खरीप हंगामासाठी विकसित केलेली आहे. या जातीचे कांदे उभट गोल असून चमकदार गर्द लाल रंगाचे आहेत. या जातीच्या कांद्याची मान बारीक, पातीची वाढ मर्यादित होते. कांदा लवकर तयार होतो. या जातीचे कांदे लागवडीपासून साधारणत: ८० ते ९० दिवसांत तयार होतात. या जातीपासून उत्पादन खरिपात हेक्टरी २८ टन आणि रांगडा हंगामात हेक्टरी ४० टन उत्पादन मिळते. साठवण क्षमता २ ते ३ महिने असते.

**एन-२-४-१ :** ही जात महाराष्ट्रात रब्बी हंगामासाठी लोकप्रिय आहे. या जातीचे कांदे गोलाकार आणि आकाराने मध्यम ते मोठे असतात. रंग विटकरी असून चव तिखट असते. साठवणुकीत ५ ते ६ महिन्यांपर्यंत टिकतो. लागवडीपासून १३० ते १३५ दिवसांत कांदा काढणीला येतो. या जातीपासून सरासरी उत्पादन हेक्टरी ३० ते ३५ टन मिळते. जांभळा करपा रोग व फुलकिडीला कमी बळी पडतो.

**ॲग्रीफाऊंड डार्क रेड :** खरीप हंगामासाठी योग्य. कांदे गर्द लाल, मध्यम तिखट, गोलाकार असतात. लवकर तयार होणारी ही जात लागवडीपासून ९० ते १०० दिवसांत तयार होते. या जातीपासून सरासरी उत्पादन हेक्टरी २० ते २७ टन मिळते.

**बसवंत-७८० :** या जातीचे कांदे गोलाकार असून शेंड्याकडे थोडे निमुळते असतात. रंग आकर्षक गडद लाल असून काढणीनंतर ३ ते ४ महिने रंग चांगला टिकून राहातो. यामध्ये डेंगळे तसेच जोडकांद्याचे प्रमाण खूपच कमी असते. बाजारात या जातीच्या कांद्यांना चांगला उठाव असतो. या जातीपासून सरासरी उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन मिळते.

**अर्का कल्याण :** या जातीचे कांदे गोलाकार, रंगाने गर्द लाल आणि चवीने तिखट असतात. लागवडीनंतर कांदे १०० ते ११० दिवसांत काढणीला येतात. या जातीपासून सरासरी उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन मिळते.

**फुले सफेद :** ही रांगडा व रब्बी हंगामासाठी योग्य जात आहे. या जातीचे कांदे मध्यम व गोल असून पांढरे शुभ्र चमकदार असतात. साठवण क्षमता साधारणत: २ ते ३ महिने असते. या जातीपासून सरासरी उत्पादन हेक्टरी २५ टनांपर्यंत मिळते.

**फुले सुवर्णा :** पिवळ्या रंगाची किंचित विटकरी छटा असणारी निर्यातीसाठी योग्य असलेली जात आहे. खरीप, रब्बी व रांगडा या तीनही हंगामात लागवडीसाठी विकसित आहे. कांदे गोलाकार, टणक व मध्यम तिखट असतात. उत्पादन हेक्टरी २३ ते २५ टन मिळते.

**अर्का निकेतन :** या जातीचे कांदे गोलाकार, रंगाने गुलाबी, बारीक मानेचे असून चवीला तिखट असतात. साठवणुकीत ५ ते ६ महिन्यापर्यंत कांदा चांगला टिकतो. उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन मिळते.

**ॲग्रीफाऊंड लाईट रेड :** ही जात रब्बी व उन्हाळी हंगामासाठी विकसित आहे. या जातीचे कांदे गोल, मध्यम ते मोठे फिकट लाल असतात. या जातीत डेंगळ्यांचे प्रमाण कमी असते. ही जात साठवणीसाठी योग्य आहे. उत्पादन हेक्टरी ३० ते ३५ टन मिळते. ■